आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in




दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक ८० वा ● शनिवार दि. १७ ऑगस्ट २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●

## मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा लढा शेकापने आक्रमकपणे लढला-भाई मोहन गुंड

माजलगाव (प्रतिनिधी) : मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा लढा शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्यासह डाव्या विचाराच्या लोकांनी महाराष्ट्रातल्या तळागाळातील शेतकरी, कष्टकऱ्यांना सोबत घेऊन आक्रमकपणे लढला. त्यामुळेच मुंबई महाराष्ट्राची होऊ शकली,असे प्रतिपादन शेतकरी कामगार पक्षाचे राज्य चिटणीस मंडळाचे सदस्य भाई मोहन गुंड यांनी माजलगाव तालुक्यातील शुक्ल तीर्थ लिमगाव येथे शेतकरी कामगार पक्षाच्या अधिवेशनात केले. महाराष्ट्र राज्याचा इतिहास हा क्रांतिकारी असून छत्रपती शिवाजी महाराज,क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले,कर्मवीर भाऊराव पाटील, लोकराजा राजर्षी शाहू महाराज,विश्र्वभुषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर,लोकशाहीर आण्णाभाऊ साठे,संत गाडगेबाबा,क्रांतिसिंह नाना पाटील या क्रांतिकारक महापुरुषांनी महाराष्ट्राला पुरोगामीत्वाची देण दिलेले असून या महापुरुषांचा वारसा शेतकरी कामगार पक्ष कायम जपत आलेला आहे.

## लोककवी वामनदादा कर्डक



महाराष्ट्राचे लोककवी, शाहीर, आंबेडकरी चळवळीचे बुलंद कार्यकर्ते आणि समाज प्रबोधनकार वामन तबाजी कर्डक यांची १५ ऑगस्ट रोजी १०२ वि जयंती होती. त्यांच्या १०२ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनकार्याचा आढावा घेणारा हा विशेष लेख.

वामनदादा कर्डक यांचा जन्म १५ ऑगस्ट १९२२ रोजी नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील देशपंडी या छोट्याशा खेड्यात एका गरीब कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव तबाजी तर आईचे नाव सईबाई असे होते. त्यांना एक मोठा भाऊ आणि एक धाकटी बहीण होती. वामनदादा यांच्या घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने त्यांना शिक्षण घेता आले नाही. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने उदरनिर्वाहासाठी दादा मिळेल ती कामे करू लागले.

जत्रा यात्रांमधून कुस्ती खेळू लागले त्यातून जे पैसे मिळत त्यातून ते घरखर्च चालवू लागले. वयाच्या विसाव्या वर्षी त्यांचे लग्न झाले पण त्यांना कौटुंबिक स्वास्थ्य लाभले नाही. त्यांच्या पत्नीचे अकाली निधन झाले पुढे मुलाचेही निधन झाले. इतके मोठे दुःख उराशी बाळगून त्यांनी मुंबई गाठली. मुंबईत त्यांनी गिरणी कामगार म्हणून काम केले. बीडीडी चाळीत त्यांचे वास्तव्य असे तिथेच त्यांची सैनिक समता दल आणि डॉ बाबासाहेब आंबेडकरांशी ओळख झाली. समता सैनिक दलातर्फे डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या सभेचे आयोजन करण्यात त्यांचा पुढाकार असायचा. वामनदादांना लहानपणापासून गायनाची आवड होती.

त्यांना मिळालेली प्रतिभा ही जन्मदत्त देणगी होती. लहानपणापासून गायनाची आवड असलेल्या वामनदादांकडे लेखणी, वाणी आणि संगीत यांचा त्रिवेणी संगम होता. एक दिवस फावल्या वेळेत ते राणीच्या बागेत बसले असताना त्यांनी एका हिंदी चित्रपट गीताचे विडंबन केले. ते गीत त्यांनी राणीच्या बागेतील गर्दीपुढे म्हटले. त्यांचे हे विडंबन गीत उपस्थित लोकांना खूप आवडले. त्यांचा आवाज आणि गाण्याचे बोल लोकांना आवडू लागले. पुढे ते आंबेडकरी जलशांमध्ये गाऊ लागले. विशेषतः ज्या ठिकाणी डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण असे त्याठिकाणी बाबासाहेबांच्या भाषणाआधी वामनदादांचे गाणे होत असे. बाबासाहेबांनी त्यांच्या गाण्याची स्तुती अनेकवेळा आपल्या भाषणांमधून केली आहे. बाबासाहेब म्हणत माझ्या दहा भाषणांचं काम शाहिरांचं एक गाणे करते. वामनदादांचे बहुतांश गीते हे लोकगीते आहेत. वामनदादांची गीते म्हणजे कोंडलेल्या मनाचा हुंकार. वामन दादांच्या गीतांचा केंद्रबिंदू हा मानव होता म्हणूनच वामनदादा म्हणतात मानवा इथे मी तुझे गीत गावे.... तुझे गीत व्हावे मानवता.

आंबेडकर भक्ती, दलित, शोषित, स्त्रीमुक्ती, जातीव्यवस्था यावर वामन दादांनी आपल्या गीतातून प्रबोधन केले. दादांनी आपल्या गीतातून हुंडाबळी, ऊसतोड कामगार, पर्यावरण, कामगार, शेतकऱ्यांचे प्रश्न, दुष्काळ यावरही भाष्य केले. त्यांच्या गीतांचे प्रेरणास्थान डॉ बाबासाहेब आंबेडकर हेच होते. वामन दादांनी स्वतः ला भीमकार्यात वाहून घेतले. दादांनी आपल्या असंख्य लोकगीतांतून लोकांना भुरळ घातली. म्हणूनच ते लोककवी झाले.

दादांनी आयुष्यभर आंबेडकरी विचारांची पताका आपल्या खांद्यावर खंबीरपणे वाहिली. आपल्या तेजस्वी लेखणीने आणि कणखर वाणीने फुले, शाहू, आंबेडकर घराघरांत पोहचवणाऱ्या या महाकवीचे १५ मे २००४ रोजी निधन झाले. लोककवी वामन दादा कर्डक यांना १०२ जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे,**
**९९२२५४६२९५**




# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कायमस्वरुपी सुरु राहणार-क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे

लातूर, : राज्य शासनाने गरजू महिला-भगिनींना आधार देण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु केली आहे. या योजनेची रक्कम लाभार्थी महिलांच्या खात्यावर जमा होण्यास सुरुवात झाली आहे. प्रत्येक पात्र महिलेला या योजनेचा लाभ मिळणार असून ही योजना कायमस्वरूपी अशीच सुरु राहणार असल्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी आज सांगितले. तसेच योजनेबाबत पसरविण्यात येणाऱ्या गैरसमजावर विश्र्वास न ठेवण्याचे आवाहनही त्यांनी केले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांची नावनोंदणी करणारे अधिकारी, यासाठी गावपातळीवर काम करणाऱ्या उदगीर, जळकोट तालुक्यातील आशा सेविका, अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका, बचतगटातील महिला आदी कर्मचाऱ्यांचा गौरव सोहळा आणि मार्गदर्शन मेळाव्यानिमित्त उदगीर तालुक्यातील कौळखेड येथील शिवम फंक्शन हॉल येथे आयोजित कार्यक्रमात ना. बनसोडे बोलत होते. यावेळी माजी आमदार गोविंद केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्र्वर निटूरे, उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, उदगीरचे तहसीलदार राम बोरगावकर, जळकोटच्या तहसीलदार सुरेखा स्वामी, उदगीरचे गट विकास अधिकारी प्रवीण सुरडकर, जळकोटचे गट विकास अधिकारी नरेंद्र मेडेवार, उदगीर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सुंदर बोंदर यांच्यासह अधिकारी, पदाधिकारी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

महिलांना दरमहा दीड हजार रुपये म्हणजेच वर्षाला १८ हजार रुपयांचा लाभ देण्यासाठी राज्य





शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु केली आहे. या योजनेसाठी अर्ज भरून घेण्यासाठी अंगणवाडी सेविका आणि पर्यवेक्षिका, आशा कार्यकर्ती, महिला बचतगटाच्या सीआरपी, अध्यक्ष आणि सदस्य महिलांनी प्रचंड मेहनत घेतली. त्यामुळे उदगीर आणि जळकोट तालुक्यातील पात्र महिलांची मोठ्या प्रमाणात ऑनलाईन नोंदणी झाली आहे. त्यामुळे नाव नोंदणीसाठी काम करणाऱ्या प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांच्या कामाची दखल घेवून त्यांचा गौरव सोहळा आयोजित करण्यात आल्याचे ना. बनसोडे यांनी सांगितले.

पात्र महिलांच्या खात्यावर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे पैसे जमा होण्यास सुरुवात झाली आहे. जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे एकत्रित तीन हजार रुपये अनेक महिलांच्या बँक खात्यात जमा झाले आहेत. उर्वरित पात्र महिलांच्या खात्यावरही लवकरच लाभाची रक्कम जमा होणार आहे. या योजनेसाठी अर्ज केलेल्या काही महिलांच्या अर्जात त्रुटी असल्याने ते अर्ज दुरुस्तीसाठी परत पाठविण्यात आले आहेत. तसेच काही महिलांच्या बँक खात्याला आधार क्रमांक जोडले नसल्याचेही निदर्शनास आले आहे. त्यामुळे अशा महिलांनी लवकरात लवकर आपल्या अर्जातील त्रुटींची दुरुस्ती करावी. ज्या महिलांच्या बँक खात्याला आधार जोडलेले नाही, अशा महिलांनी आपल्या बँकेत जावून बँक खात्याला आधार क्रमांक जोडून घ्यावा, असे आवाहन ना. बनसोडे यांनी केले.

उदगीर येथे एमआयडीसी मंजूर करण्यात आली असून याठिकाणी मोठे उद्योग सुरु होवून युवकांसाठी रोजगार उपलब्ध होतील. तसेच तालुक्यातील आरोग्य सुविधांच्या बळकटीकरणाचे काम गेल्या पाच वर्षात करण्यात आले आहे. रस्त्याच्या विकासामुळे दळणवळण सुविधा गतिमान झाल्याचे ना. बनसोडे यावेळी म्हणाले.

यावेळी उपस्थित असलेल्या महिलांनी ना. बनसोडे यांना राखी बांधून त्यांचे औक्षण केले. तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची रकम बँक खात्यात जमा होण्यास सुरुवात झाल्याबद्दल आभार मानले. ना. बनसोडे यांच्या हस्ते अंगणवाडी सेविका, आशा सेविका, महिला बचतगटाच्या सीआरपी, अध्यक्ष आणि सदस्यांचा यथोचित गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला उपस्थित पदाधिकारी, अधिकारी आणि महिलांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.

## वाघोरा जिल्हा परिषद शाळेत स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा दिपक माने यांनी २०० स्कूल बॅग केल्या वाटप

माजलगाव (प्रतिनिधी)भारतीय स्वातंत्र्य दिन १५ ऑगस्ट गुरुवार रोजी माजलगाव तालुक्यातील वाघोरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात सकाळच्या मंगलमय वातावरणामध्ये देशभक्तीपर गीत वाजत गाजत विद्यार्थ्यांच्या घोषणांचा आवाज मोठ्या उत्साहात गावातून प्रभात फेरी काढण्यात आली. शाळेचे मुख्याध्यापक प्रमुख पाहुणे मान्यवरांच्या हस्ते महामानवांच्या प्रतिमापूजन करून ध्वजारोहण तिरंगा ध्वजास मान वंदना देण्यात आली नंतर राष्ट्रगीत गायन झाले. प्रमुख पाहुणे व मान्यवरांचा स्वागत सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी भाषणे केली गीत गायन देशभक्तीपर गीतावर नृत्य सादर केले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे श्री. दीपक माने हे अमेरिकेमध्ये इंजिनियर आहेत त्यांनी आपल्या देशात च्या काही ना काही ऋणातून उतराई होण्यासाठी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना २०० स्कूल बॅग वाटप केल्या व शाळेसाठी मदत २५ हजार रुपयाची वस्तू देण्याचे आश्र्वासन सुद्धा दिले. वाघोरा गावचे प्रथम नागरिक सरपंच श्री. मधुकर नाना बादाडे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा सत्कार केला त्यावेळी त्यांनी शाळेला ११ हजार रुपये देणगी देण्याचे आश्र्वासन दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री. बादल डेंगळे होते तर प्रमुख पाहुण मा. पं. स.सदस्य करीम कुरेशी, उपसरपंच शेख बाबुभाई ,ग्रामपंचायत सदस्य अजय भैय्या राऊत,सचिन महाराज काष्टे,होते. प्रमुख उपस्थिती शा.व्य.स. अध्यक्ष अरुण बादाडे उपाध्यक्ष गणेश बादाडे, माजी सैनिक मधुकर माने या मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विनोद जाधव यांनी केले. सूत्रसंचालन, नृत्य मार्गदर्शन केशव बादाडे व राहुल खुणे यांनी केले. शिक्षक राजेभाऊ अबुज, तुळशीदास गुंदेकर, संतोष ढोणे यांनी आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य श्रीराम बादाडे,बापू बादाडे, लखन बादाडे, गणेश बादाडे, रामप्रसाद बादाडे यांनी केले. सर्व उपस्थितांचे आभार बबन पोटे सरांनी मानले. कार्यक्रमास गावकरी माता पालक विद्यार्थी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संत सेवालाल महाराज सभागृहाचे आज भूमिपूजन खा. अशोकराव चव्हाण यांच्या प्रयत्नांची फलश्रुती

भोकर - भोकर नगरपरिषदेच्या वतीने नियोजित श्री संत सेवालाल महाराज सामाजिक सभागृहाचे शनिवारी १७ ऑगस्ट रोजी दुपारी ४.१५ वाजता भोकर येथील किनवट रोडवर पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते भूमिपूजन होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी या स्मारकाच्या मंजुरीसाठी प्रयत्नशील राहिलेले माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण असणार आहेत. नांदेड जिल्ह्यात विशेषतः भोकर तालुक्यामध्ये बंजारा समाजाची मोठी लोकसंख्या आहे. बंजारा समाजाचे अनेक जुने तांडे या तालुक्यात अजूनही दिसून येतात. भोकर येथे श्री संत सेवालाल महाराज यांचे स्मारक व सभागृह उभारण्याची मागणी स्थानिक बंजारा समाजाकडून केली जात होती. या मागणीला पाठिंबा देत खा. अशोकराव चव्हाण यांनी या स्मारकासाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा चालवला होता. अखेर राज्य सरकारच्या नगर विकास विभागाने वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत नगरपरिषदांना दिल्या जाणाऱ्या निधीतून या स्मारकाच्या व सभागृहाच्या कामाला मंजुरी देण्यात आली.

## भोकर येथील ओबीसी आरक्षण बचाव मेळाव्यास लाखोच्या संख्येने उपस्थित रहा- नामदेव आयलवाड

भोकर- ओबीसी आरक्षण बचावासाठी भोकर येथे १८ ऑगस्ट २०२४ रोजी ओबीसी आरक्षणाचे योधे प्रा.लक्ष्मणराव हाके यांच्या उपस्थितीत आरक्षण बचाव मेळावा घेण्यात येत असून जिल्ह्यातील ओबीसी बांधवांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन ओबीसी नेते नामदेवराव आयलवाड यांनी केले आहे.



ओबीसी आरक्षणासाठी महाराष्ट्रभर आंदोलन करण्यात येत असून ओबीसींच्या न्याय हक्काचे आरक्षण हिरावून घेतल्या जात आहे अशा गंभीर परिस्थितीत सर्वत्र ओबीसी आरक्षण बचाव मेळावे घेण्यात येत आहेत ओबीसी बांधवांची संघटन शक्ती मजबूत होत आहे ,भोकर येथे दि.१८ ऑगस्ट २०२४ रोजी ओबीसी आरक्षणाचे योधे प्रा.लक्ष्मणराव हाके यांच्या उपस्थितीत ओबीसी आरक्षण बचाव मेळावा सकाळी ११ वाजता मोंढा मैदान येथे होणार असून तत्पूर्वी ९ वाजता उमरी चौक येथून पारंपारिक वेशात भव्य रॅली काढण्यात येणार आहे या भव्य दिव्य मेळाव्यास जिल्ह्यातील ओबीसी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भोकर तालुका सकल ओबीसी समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

# आई वडिलांच्या कष्टाची जाणीव हीच खरी प्रेरणा - डॉ वाघमारे

लातूर : आपण शिक्षण घेऊन मोठे व्हावे यासाठी आई वडील मोल मजुरी करतात तुमच्या वाट्याला दुःख कष्ट येऊ नये म्हणून रात्र न दिवस काबाड कष्ट करतात त्यांच्या या कष्टाची जाणीव जाणीव ठेवणे यासारखी दुसरी प्रेरणा नाही असे असे प्रतिपादन डॉ सुरेश वाघमारे यांनी केले

१५ ऑगस्ट रोजी समाज कल्याणच्या मागासवर्गीय (गुणवंत ) विद्यार्थी वसतिगृहात आयोजित विद्यार्थी - पालक मेळाव्यात ते बोलत होते. या वेळी विचार पिठावर या वसतिगृहाचे अधीक्षक पवन बारकुल अ‍ॅड मंचकराव डोणे, बहादुर थोरात होते.

पुढे बोलताना डॉ वाघमारे म्हणाले की तुमच्या गुणवत्ते मुळे तुम्हाला गुणवंत वसतिगृहात प्रवेश मिळाला आहे. बारकुल यांच्या सारखे गुणवंत अधीक्षक मिळाले आहे. या संधीच सोन करा पणं वसतिगृह म्हणजे विश्राम गृह नाहीत तर ऊर्जा केंद्र आहेत.





तुम्हाला उंच शिखरावर घेवून जाणारी सिडी आहे हे लक्षात ठेवा. मन लावून अभ्यास करा, कष्ट घ्या कारण यशाकडे जाणाऱ्या मार्गाला शॉर्ट कट नाही त्यामुळं कष्ट करून आपल्यासह आपल्या आई वडील यांचं स्वप्न साकार करा.

या प्रसंगी अ‍ॅड मंचकराव डोणे, बहाद्दूर थोरात यांनी मार्गदर्शन केले काही पालकांनी मनोगत व्यक्त केले अधीक्षक पवन बारकुल यांनी प्रास्ताविक केले आभार मानले विद्यार्थी प्रणव गायकवाड यांनी सूत्र संचलन केले या कार्यक्रमास पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## बालकांमधील श्रवणदोष दूर करण्यासाठी लातूर जिल्हा प्रशासनाची 'साद'

लातूर, : जिल्ह्यातील शून्य ते सहा वर्षे वयोगटातील श्रवणदोष असलेल्या बालकांचा शोध घेवून, त्यांच्यावर वेळीच आवश्यक उपचार करण्यासाठी जिल्हा प्रशासाने 'मिशन साद' हा महत्वपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. उमंग इन्स्टिट्यूट आणि राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम चमूच्या सहकार्याने हा उपक्रम राबविला जाणार असून क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते आज (दि. १५) या उपक्रमाला सुरुवात झाली. एक हजारातील ५ मुलांमध्ये श्रवणदोष आढळून येतो. यावर वेळीच उपचार न झाल्यास या मुलांना कायमस्वरूपी बहिरेपणा येतो. ऐकण्याची क्षमता नसल्याने संभाषण क्षमतेवरही परिणाम होवून या मुलांमध्ये ऐकण्याचे व बोलण्याचे दिव्यांगत्व येते. त्यामुळे जिल्ह्यातील अशा बालकांचा वेळीच शोध घेवून त्यांच्यावर आवश्यक उपचार करणे आणि लातूर जिल्हा श्रवणदोष मुक्त करण्यासाठी लातूर जिल्हा प्रशासनाने 'मिशन साद' हा उपक्रम हाती घेतला आहे. ग्रामीण भागातील पालकांना आपल्या बालकांमधील श्रवणदोषासारखे आजार, दिव्यांगत्व लवकर लक्षात येत नाही. किंवा त्यावर काय उपचार केले जातात, याची माहिती त्यांना नसते. त्यामुळे श्रवणदोषाचे निदान आणि उपचारासही विलंब होवून बालकांमध्ये दिव्यांगत्व निर्माण होण्याची होते. हे टाळण्यासाठी 'मिशन साद' अंतर्गत उमंग आणि राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमचे चमू प्रत्येक अंगणवाडीमध्ये जावून शून्य ते सहा वर्षे वयोगटातील बालकांची आरोग्य तपासणी करणार आहे. या आरोग्य तपासणीमध्ये श्रवणदोष आढळणाऱ्या बालकांवर पुढील उपचार करण्यात येणार आहेत.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

# विश्वास महत्वाचा !

## संपादकीय...

लोकशाहीवादी भारताच्या राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यानी भारतीय राज्य घटनेवरील विश्वास महत्वाचा ठरतो, तो असायला हवा आणी त्यासाठी आपण कटीबध्द असले पाहीजे आणी आहोत असे प्रतिपादन स्वतंत्र भारताच्या स्वतांत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला आमजनतेला संबोधीत करताना केले आणी संविधानातील कायदे, संकल्प, न्यायीकपणे हाताळण्याची गरज स्पष्ट करुन भारत सरकारच्या विविध योजनाचा आढावा घेवून त्या योजना न्यायीक असल्याचा कळत न कळत दावा करुन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे कौतूक करायला त्या विसरल्या नाहीत.

काल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानी राष्ट्राला उद्देशून जे कांही भाषण केले, जो कांही प्रगतीचा आढावा घेतला त्यावरुन उपस्थितांनी दाद दिली असली तरी देशभरातील ज्या, ज्या नागरीकानी सामाजीक कार्यकर्ते पत्रकारानी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे भाषण ऐकले असेल तर त्यानी मनोमन स्वातंत्र्याचे झाले काय, आमच्यापर्यंत आलेपनाय, असेच उद्‌गार काढून ते ऐकणेच टाळले असावेत यात संदेह नसावा असे म्हटल्यास वावगे ठरु नये. कारण तेच ते गळा काढून सर्वांगीण विकास, विविध प्रकल्प, योजनाचा भडीमार यापेक्षा ठोस असे कांहीच नसल्याने मोदीजीचे भाषण हे त्यांच्या कोणी तरी चमच्याने लिहीलेले भाषण असावे असे स्पष्ट मत एका भाजपाच्या जाणकार, जून्या कार्यकर्त्याने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूतळ्या समोर उभे राहून बोलल्याची कुजबूज होताना दिसते आहे ती बोलकी असावी अशीच कुजबूज होताना दिसते आहे हे वास्तव नाकारता येण्यासारखे नसावे असे म्हटल्यास वावगे ठरु नये.

ज्या कोणी वृध्दानी लिखित किंवा प्रत्यक्षात पंडीत जवाहरलाल नेहरु, इंदिरागांधी, चंद्रशेखर, व्ही.पी. सिंग, अटलबिहारी बाजपेयी, राजीव गांधी यांची भाषणे ऐकली असतील तर ते नक्कीच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासारखा बोलघेवडा, नौटंकी पंतप्रधान नको रे बाबा असेच ते, ते म्हणत असतील तर त्यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाहीच पण लोकशाही भारताच्या पंतप्रधानाचे कौतूक करणे हे तमाम भारतीयाचे आद्यकर्तव्य ठरते म्हणून अशांचा मतस्विकार करणे उचित नसावे असे वाटते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वतंत्र भारताचा अकरावा स्वातंत्र्यदिन त्यांच्या कार्यकाळातील साजरा करताना लालकिल्ल्यावरुन ते कांहीतरी नवीन संकल्प, नवीन योजना, घोषणा करतील अशी अपेक्षा होती परंतू नेहमीचेच रटाळ, गळा काढून अगतीक हावभावाने ओतप्रत भरलेले भाषण हे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे की गुजराती भाजपा कार्यकर्ते मोदीजीचे असेल अशीच लोकभावना व्यक्त होताना दिसते आहे. परंतू स्वतंत्र भारताचा अकरावेळा स्वातंत्र्यदिन साजरा करणारे मोदीजी भाग्यवानच ठरतात.

## झरोका

एक – अनुसूचित जाती, जमातीसाठी क्रिमीलेअर लागू करणे बाबतचा निर्णय मागे घेतला की नाही याचा उल्लेख स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानी केला नाही पण दलित, शोषीत, पिडीत, वंचिताचे कल्याण करणार असल्याची नौटंकी मात्र केली यातील गौडबंगाल काय आहे तेच कळत नाही. डोकं बधीर झालय.

दुसरा – अरे, अनुसूचित जाती, जमातीचे उपवर्गीकरण करणे क्रिमीलेअर लागू करणे म्हणजे ते समतेसाठी नसून राष्ट्रीय स्वंयसेवक संघाच्या सामाजीक समरसतेचे मूळ आहे. हे लक्षात घेतले पाहीजे परंतू संसदेतले या समूहातील मंत्री, लोकप्रतिनिधीच लेचेपेचे असल्याने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी याना बळ मिळते आहे.

एक – अहो, पण क्रिमीलेअरच्या अटीत एक टक्का ही लोक बसत नाहीत मग हा उपवर्गीकरणाचा, क्रिमीलेअर, नॉन क्रिमीलेअर अट कशासाठी म्हणतोय यासाठी उठाव केला पाहीजे. अन्यथा उपवर्गीकरणच काय पून्हा मनुसंस्कृती मानगुटीवर बसल्याशिवाय राहाणार नाही ही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची घातकी चाल आहे. व्यापक आंदोलनणाची गरज वाटते आहे.

दुसरा – अरे, हे सगळं बरोबर आहे. पण देशभरातील मागासवर्गीय आमदार, खासदार, मंत्री वगैरे नेतेच भेकड, स्वार्थी असतील तर उपवर्गीकरणच काय चक्क बेदख्खल करण्यापर्यंत मोदाड संस्कृतीची मजल जाईल या बाबतीत सर्तक राहून उग्रतेने न्यायीक लढा देणे हीच काळाची गरज आहे.

## काय बोलता राव ?

मराठा आरक्षणावरुन काय चाललय काय तेच कळत नाही. कारण मराठा आरक्षण लागू करण्यासाठी शरद पवार हेच जबाबदार आहेत म्हणून आम्ही महायूती सरकारकडे मागणी रेटून धरत आहोत असे मराठा आंदोलक जरांगे पाटील म्हणतात तर ओबीसी आरक्षणवादी नेते लक्ष्मण हाके हे जरांगे पाटील याना शरद पवार यांचेच पडद्यामागून पाठबळ असल्याचा आरोप करतात यातील काय गौडबंगाल असेल हेच कळत नाही.

**काय बोलता राव,**

अरे, मराठा समाजाला कूणबी समजून ओबीसी कोट्यातून आरक्षण मिळूच शकत नाही हे सत्ताधारी विरोधी लोकप्रतिनिधीसह जरांगे पाटील, लक्ष्मण हाके, मंत्री छगन भूजबळ यांचे सह मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री महोदयाना ज्ञात, ठाऊक आहे परंतू जातीय राजकारण करणे आणी आपापले लोकप्रतिनिधीत्व टीकविणे हाच ठेका धरुन आरक्षणवाद, विरोध कायम जोपासला जातो एवढेच मराठा आरक्षण, ओबीसी आरक्षणातील मूळ विषय आहे मग कोणाला कोण सांगावे बोला दाजीबा !

## प्राथमिक शिक्षणातील अडचणी आणि उपाय योजना: एक शिक्षकाचा दृष्टिकोन

माझ्या ३३ वर्षांच्या शैक्षणिक कारकिर्दीत,मी अनेक विद्यार्थ्यांच्या समस्यांचा सामना केला आहे आणि त्यावर योग्य उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला आहे.प्रत्येक विद्यार्थ्याची गरज वेगळी असते,आणि त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी वैयक्तिक लक्ष देणे अत्यंत महत्त्वाचे आहे.शिक्षणाच्या या प्रक्रियेत, विद्यार्थ्यांना त्यांच्या पूर्ण क्षमतांपर्यंत पोहोचवण्यासाठी विविध दृष्टिकोन आणि उपायांचा वापर केला पाहिजे. शिक्षक म्हणून,माझे ध्येय नेहमीच विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणात सर्वात चांगले मार्गदर्शन देणे आणि त्यांचे सर्वांगीण विकास सुनिश्र्चित करणे असे आहे.या लेखात,मी अनुभवलेल्या समस्या आणि त्यावर केलेल्या उपाययोजनांची माहिती देत आहे, ज्यामुळे आपल्याला या समस्यांचा अधिक चांगला अंदाज येईल आणि आपल्याला त्यावर प्रभावी उपाययोजना करण्यास प्रेरणा मिळेल.मला मिळालेल्या शिकवणींनी आणि उपाययोजनांनी हे सिद्ध केले आहे की,शिक्षकांच्या जागरूकतेची, समुपदेशनाची,आणि व्यक्तिगत लक्ष देण्याची आवश्यकता आहे.आशा आहे की,हा लेख तुमच्यासाठी उपयोगी ठरेल आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणात सुधारणा करण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकण्यास मदत करेल.

विद्यार्थ्यांच्या शिकण्यातील अडचणी ओळखण्यासाठी आणि त्यांना योग्य शिक्षण देण्यासाठी शाळेत दाखल करत असताना संपूर्ण शारीरिक आणि मानसिक तपासणी आवश्यक आहे. खालील कारणांमुळे ही तपासणी महत्त्वाची आहे.

शारीरिक समस्या:

दृष्टी दोष : कमी दृष्टी,दूरदर्शन दोष,असे दृष्टिदोष असतात जे विद्यार्थ्यांच्या शिकण्यावर परिणाम करतात.

ऐकू येण्यास अडचण : कमी ऐकू येणे किंवा श्रवणातील दोष.

शारीरिक विकार : अशक्तपणा,अपंगत्व, शारीरिक असामान्यतासंबंधित समस्या.

मानसिक आणि भावनिक समस्या: मानसिक आघात: कौटुंबिक समस्या, बालकामगार,इ.मुळे मानसिक आघात.

वेडसरपणा किंवा हिंसक वर्तन : अनुकूल वातावरणाच्या अभावामुळे असामान्य वर्तन.

अवसाद किंवा चिंता : पालकांच्या वादविवाद किंवा आर्थिक तणावामुळे उद्भवलेले भावनिक अडचणी.

शैक्षणिक समस्या: शिकण्यातील अडचणी: डिस्लेक्सिया,कॅल्क्युलस.

वाचन आणि लेखन समस्या : अक्षरे ओळखण्यात किंवा शब्दलेखनात अडचण.

असामान्य विचारशक्ती : कमी लक्ष केंद्रीकरण,विचारशक्तीचा विकास कमी असणे.

सामाजिक आणि पारिवारिक समस्या :

कौटुंबिक पार्श्र्वभूमी : सामाजिक आणि आर्थिक कुपरस्थिती,पालकांचे शिक्षण कमी असणे.

सामाजिक अपमान : आर्थिक स्थितीमुळे कमीपणा किंवा तिरस्कार.

विकसनात्मकसमस्या :

विकसनाच्या अडचणी: मोटर कौशल्यांची कमी, भाषाशक्तीचा विकास कमी.

डिस्लेक्सिया: काही मुलांना डिस्लेक्सिया असतो,ज्यामुळे त्यांना वाचन आणि लेखनात अडचणी येतात.

मानसिक आघात : काही मुलं मानसिक आघातामुळे वेडसर किंवा हिंसक होतात.

माझे अनुभव

माझ्या अनुभवांमध्ये मला विविध प्रकारच्या समस्यांचे मुलं भेटली आहेत. मी त्यांच्या समस्या समजून घेतल्या आणि त्यांच्यासाठी उपाययोजना केल्या आहेत. त्यावर उपाययोजना पुढीलप्रमाणे आहेत.

दृष्टी दोष असलेल्या मुलांना: नियमित नेत्रतपासणी आणि योग्य चष्म्याची सोय करणे.

कमी ऐकू येणाऱ्या मुलांसाठी श्रवणयंत्राची व्यवस्था आणि श्रवणविकासाचे प्रशिक्षण देणे.

डिक्लेसिया असलेल्या मुलांसाठी: विशेष शिक्षण पद्धती आणि तंत्रज्ञानाचा वापर करणे.

मानसिक आघात असलेल्या मुलांसाठी: समुपदेशन आणि मानसिक आरोग्यसेवा देणे.

सरकारने करावयाच्या उपाय योजनाविद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक तपासणीसाठी मोफत चाचण्या: सरकारने मोफत चाचण्या आणि रिपोर्ट उपलब्ध करून दिले पाहिजेत.

विशेष शिक्षण प्रशिक्षण: शिक्षकांसाठी विशेष शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले पाहिजेत.

समुपदेशन सेवा: शाळांमध्ये समुपदेशन सेवा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

पालकांनी करावयाच्या उपाय योजनामुलांच्या आरोग्याची काळजी: पालकांनी मुलांच्या आरोग्याची नियमित तपासणी करून त्यांची काळजी घेतली पाहिजे.

शिक्षकांशी संवाद : पालकांनी शिक्षकांशी नियमित संवाद साधून मुलांच्या समस्यांविषयी माहिती घेतली पाहिजे.

समुपदेशन : मुलांच्या मानसिक आरोग्याची काळजी घेतली पाहिजे आणि आवश्यकतेनुसार समुपदेशन घेतले पाहिजे.

शिक्षकांनी घ्यायची काळजी

विद्यार्थ्यांच्या समस्यांची ओळख:शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या समस्यांची ओळख पटवून त्यांच्यासाठी योग्य उपाययोजना केल्या पाहिजेत.

तंत्रज्ञानाचा वापर : शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांना मदत केली पाहिजे.

समुपदेशन आणि समर्थन: विद्यार्थ्यांना समुपदेशन आणि समर्थन दिले पाहिजे.

समाजाने करावयाच्या उपाय योजना

शाळांना मदत : समाजाने शाळांना आर्थिक आणि मानसिक समर्थन दिले पाहिजे.

समुपदेशन केंद्रे : समाजात समुपदेशन केंद्रे उभारली पाहिजेत आणि त्यांच्या सेवांचा लाभ घेतला पाहिजे.

जागरूकता वाढवणे:विद्यार्थ्यांच्या समस्यांविषयी जागरूकता वाढवून त्यांच्या सहाय्यासाठी उपाययोजना केल्या पाहिजेत.

विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याची तपासणी शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. शाळा दाखल करण्याच्या वेळी संपूर्ण तपासणी केल्यास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी ओळखून त्यांच्यावर योग्य उपचार आणि उपाययोजना करता येतील.शिक्षक,पालक,सरकार,आणि समाज या सर्वांनी एकत्रितपणे काम केल्यास विद्यार्थ्यांना संपूर्ण शिक्षण देणे शक्य होईल.शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या समस्या ओळखून त्यांच्या विशेष गरजांचा विचार करून शिक्षण दिल्यास विद्यार्थ्यांचा विकास अधिक चांगला होईल. पालकांनी मुलांच्या आरोग्याची काळजी घेणे, शिक्षकांशी संवाद ठेवणे,आणि समुपदेशन सेवांचा लाभ घेणे आवश्यक आहे. सरकारने मोफत तपासणी सेवा आणि विशेष शिक्षण कार्यक्रम उपलब्ध करून दिल्यास शिक्षणाचा पाया सुधारेल. समाजाने शाळांना मदत करून आणि जागरूकता वाढवून या प्रयत्नांना बळकटी दिली पाहिजे.या सर्व प्रयत्नांमुळे विद्यार्थी शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या स्वस्थ राहतील आणि शिक्षणाच्या सर्वच स्तरांवर प्रगती करतील. त्यामुळे समाजाच्या सर्व स्तरांवर शिक्षणाचा सकारात्मक परिणाम दिसून येईल.

**डॉ.आशा अशोक ब्राह्मणे ८१०८८२०४५४**
**आदर्श शिक्षिका(बी एम सी)**
**मढ मराठी मुंबई पब्लिक स्कूल मालाड(प) मुंबई**

## बहुजन मुक्ति पार्टीच्या नांदुरा तालुका अध्यक्ष पदी अरूण सुरवाडे यांची निवड.

मलकापूर प्रतिनिधी:– आज मलकापूर



येथील शासकीय विश्रामगृहात बहुजन मुक्ती पार्टीचे मलकापूर विधानसभा क्षेत्रातील कार्यकर्ता पदाधिकारी यांची बैठक पार पडली.

बहुजन मुक्ती पार्टीचे पश्र्चिम विदर्भ तथा प्रदेश महासचिव सुजित बांगर यांच्या प्रमुख उपस्थितीत मलकापूर विधानसभा क्षेत्रातील बहुजन मुक्ती पार्टीचे कार्यकर्ता पदाधिकारी यांची महत्त्वपुर्ण आढावा बैठक बोलावण्यात आली होती तेव्हा पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून सविस्तर आढावा घेण्यात आला. गेल्या तीन वर्षांपासून पक्षाचे काम निर्भिडपणे व एकनिष्ठेने करत असलेले अरूण सुरवाडे यांची निवड नांदुरा तालुका अध्यक्ष पदी करण्यात आली यावेळी बहुजन मुक्ती पार्टीचे मलकापूर विधानसभा प्रभारी इलियाज खान यांच्या हस्ते पुष्प गुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले यावेळी मलकापूर विधानसभा क्षेत्रातील बहुजन मुक्ती पक्षाचे कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते. सागर तायडे यांस कडून

## दयानंद शिक्षण संस्थेच्या सर्वच महाविद्यालयाच्या वतीने आयोजित भव्य तिरंगा रॅलीस उत्स्फूर्त प्रतिसाद

लातूर : येथील दयानंद शिक्षण संस्थेच्या दयानंद विज्ञान,कला,वाणिज्य,विधी,फार्मसी सर्वच महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या वतीने १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त हर घर तिरंगा उपक्रमा अंतर्गत भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीची सुरूवात दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी यांनी झेंडा दाखवून केली. दयानंद शिक्षण संस्था ते छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत निघालेल्या या रॅलीत संस्थेचे सचिव रमेश बियाणी,सदस्य रामकिशन मालू,विशाल अग्रवाल,अशोक पाटील,सागर मंत्री,कुणाल कोरे,दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड,दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे,दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.प्रशांत मान्नीकर,दयानंद फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.क्रांती सातपुते,दयानंद विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पुनम नाथानी यांच्यासह विद्यार्थी यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

## बोरगाव ते मुरुड अकोला रस्त्याचे काम अखेर सुरू आ. धिरज देशमुख यांनी जाब विचारल्यानंतर अधिकाऱ्यांना जाग

लातूर/प्रतिनिधी : लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी अधिकाऱ्यांना बोलावून घेवून ग्रामस्थांच्या समोर जाब विचारल्याने बोरगाव ते मुरुड अकोला रस्त्याचे प्रत्यक्ष काम सुरु झाले. त्यामुळे ग्रामस्थांनी आ. धिरज विलासराव देशमुख यांचे आभार मानले. लातूर–टेंभूर्णी राष्ट्रीय महामार्गावरील बोरगाव ते मुरुड अकोला दरम्यानचा रस्ता रखडल्याने प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. त्यामुळे बोरगाव येथे ग्रामस्थ व राष्ट्रीय महामार्गचे कार्यकारी अभियंता यांची आ. धिरज विलासराव देशमुख यांनी मंगळवारी, १३ ऑगस्ट रोजी बैठक घेतली. लातूर–टेंभूर्णी राष्ट्रीय महामार्गावरील बोरगाव ते मुरुड अकोला या रस्त्याचे चालू असलेले काम थांबवण्याबाबत कोणत्याही स्पष्ट सूचना नसताना या रस्त्याचे काम का थांबवण्यात आले, अशा शब्दात आ. धिरज विलासराव देशमुख यांनी राष्ट्रीय महामार्गचे कार्यकारी अभियंता यांना जाब विचारला. रस्त्याचे काम तात्काळ सुरू झाले नाही तर तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. त्यामुळे या रस्त्याचे काम गुरुवार, १५ ऑगस्ट पासून सुरू करू, अशी ग्वाही राष्ट्रीय महामार्गचे कार्यकारी अभियंता यांनी दिली होती. त्यानुसार या रस्त्याचे काम गुरुवार, १५ ऑगस्ट पासून सुरू झाले आहे. त्यामुळे ग्रामस्थांना, वाहनचालकांना दिलासा मिळाला आहे. या प्रसंगी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी चेअरमन सुरेश बाप्पा पांढरे, चेअरमन वीरसेन भोसले, सरपंच दनेश मस्के, मुख्तार शेख, बाळासाहेब मुरलीधर बिडवे, धर्मराज बिडवे, आप्पासाहेब रोंगे, परमेश्र्वर गिराम, सचिन आंबेकर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी आ. धिरज विलासराव देशमुख यांचे आभार मानले.

## राष्ट्रवादी काँग्रेस श प ची शिव स्वराज्य यात्रा म्हणजे न्याय नाकारणारी ढोंग यात्रा

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे वतीने महाराष्ट्रातील येणाऱ्या विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन महाराष्ट्रातील बहुजन जनतेला छत्रपती शिवराय यांच्या नावाने भावनिक बनवण्या साठी शिव स्वराज्य हे नाव घेऊन ३१विधान सभा मतदार संघात पहिल्या टप्प्यात ही यात्रा फिरणार आहे.आणि रयतेचे राज्य स्थापन करण्यासाठी ही यात्रा असेल असे प्रवचन राष्ट्रवादी काँग्रेस श प पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष आ.जयंत पाटील साहेब यांनी माध्यमांना सांगितले.त्यांच्या या घोषणेला काही बहुजन बळी पडतील असा त्यांचा गोड गैरसमज आहे.

छत्रपती शिवरायांचे राज्य हे रयतेचे का झाले? याचे कारण त्यांची रयतेच्या प्रति असलेली बांधिलकी,त्यांच्या हिताची जोपासना करण्यासाठी त्यांची समर्पण वृत्ती, आणि त्यांची न्याय प्रियता त्यास कारणीभूत होती.छत्रपती शिवराय यांच्या सद्गुण पैकी ५% तरी सद्गुण व खरेपन राष्ट्रवादी काँग्रेस कडे आहे काय ? याचे आत्मपरीक्षण ते करणार आहेत काय? हा खरा प्रश्र्न आहे.त्यांचे वर्तन पाहता त्यांच्या जहागिरी कायम रहाव्यात,आणि त्यांची हुजरे गिरी करणाऱ्यांना बक्षिसी मिळावी म्हणून इतरांच्या न्याय हक्कावर गदा आणून मागास वर्गीय समाजाचे खोटे दाखले काढून मागास वर्गीय समाजाच्या आरक्षित जागेवर दिवसा ढवळ्या दरोडे टाकणारे हे आधुनिक काळातील सत्ता पिपासू दरोडेखोर आहेत.त्यांच्या तोंडी छत्रपती शिवरायांचे नाव ही शोभत नाही, आणि त्यांनी शिव स्वराज्याचे नाव ही तोंडात घेऊ नये.तो हक्क त्यांना अजिबात राहिलेला नाही.

शिवकालातील त्यांच्या कठोर न्यायदानाचे अनेक किस्से आहेत.त्यांचा न्याय कसा होता,एखाद्याच्या मृत्यू नंतर ही त्याचा हक्क न डावलनारे राजे होते.मराठेशाहीम्हणून प्रवीण जी भोसले हे इतिहास तज्ञ आहेत.आणि ते जे मांडणी करतात ती लेखी पुराव्या निशी असते.बाजी पासलकर यांच्या संदर्भातील देशमुखीचां हक्क या संबंधाने त्यांनी एक हकीगत सांगितलेली आहे.मोर्से खोऱ्याची देशमुखी पासलकर यांच्या कडे होती, यातील यशवंत हे पासलकर यांच्या घरातील थोरल्या शाखेचे तर बाळाजी पासलकर हे हे मधल्या शाखेचे,काही कारणाने ही देशमुखी मधल्या कडे आणि धाकट्या शाखेकडे फिरत राहिली व हा शिक्का देशमुखी ची संनद कुणाकडे असावी या संबंधाने त्यांच्यात वाद होता.हा तंटा चालू असताना निवाड्या पूर्वी अचानक आदिलशाही चे सरदार फत्तेखान याची स्वारी चालून आली १६४८ साली ही लढाई तीन टप्प्यात पार पडली,शिरवळ येथील भुईकोट किल्ला, त्या नंतर सासवड जवळील बेलसर गावी पडलेल्या फत्तेखान चे छावणी वरील हल्ला आणि त्या नंतर पुरंदर वरील लढाई.

बेलसर येथील छावणीवर हल्ला करण्याच्या मोहिमेची जबाबदारी महाराजांनी बाजी यांच्या वर सोपवली.तेंव्हा बाजी यांनी महाराजांकडे अर्ज केला.मजला बेलसर चे मोहिमेस महाराज रवाना करितात तेंव्हा साहेब कामावरी सेवक जावयास मागे सरतो ऐसे नाही,परंतु बाळाजी चां व माझा देशमुखी चां निवाडा आला नाही, इतका हेतू माझा राहतो ये विसी सेवकास आज्ञा काय?. तेंव्हा महाराजांनी आज्ञा केली की, सांप्रत तुम्ही मोहिमेस जाणे,तुमचा सिक्का मजपाशी आहे,तुम्ही साहेच काम फत्ते करून सुरक्षित आलिया वरी तुमचा शिक्का बाळाजी पासून घेऊन तुम्हांस बहाल केला जाईल,ये वीसी फिकीर न करणे कदाचित तुम्ही साहेब कामावर खर्च जाला तर शिक्का तुमचे गोरी वर ठेऊ हा निशा समजून तुम्ही खुशाल येसे जाणे.या मोहिमेत बाजी पासलकर यांना वीरमरण आले,पण छत्रपती यांनी दिलेला शब्द पाळून आजूबाजूच्या अनेक मात्तब्बर देशमुख घराण्याच्या समोर न्याय निवाडा करून बाजी पासलकर यांच्या घरान्या कडे ते अधिकार दिले.

भारतीय राज्य घटनेने अनु जाती वर्गातील लोकांच्या साठी प्रतिनिधित्व असावे म्हणून आरक्षणाची तरतूद केलेली असताना तिला डावलून त्या जागी सर्वा अधिक इतर जात वर्ग समूहाची घुसखोरी फक्त राष्ट्रवादी काँग्रेस ने केली आहे.सोलापूर जिल्ह्यातील राखीव जागेवर खऱ्या मागास वर्गीय लोकांना डावलून कैकाडी (एन टी) मधील यशवंत माने यांना तर माळशिरस तालुक्यात ती धनगर नेते उत्तम राव जानकर यांना देण्यात आलेली आहे.

छत्रपती शिवराय यांचा असाच दुसरा एक निवाडा आहे.छत्रपती शिवराय यांनी राज्याभिषेक केल्याने ते अधिकृत राजे झाले तर त्यांचे पुत्र संभाजी राजे हे युवराज म्हणून घोषित झाले. छत्रपती संभाजी महाराज यांचे सासरे पिलाजी राव शिर्के हे चिंचवड चे मोरया गोसावी यांचे शिष्य. तेथील देवस्थान साठी शिर्के यांच्या मध्यस्थीने उत्सव साजरा करण्यासाठी मोरया गोसावी यांनी आजूबाजूच्या शेतकऱ्या कडून भात आणि मीठ घेण्याची सनद मिळवली.त्यांना त्या प्रमाणे ती मिळकत होत राहिली,पण एकदा दुष्काळ पडला आणि गरीब शेतकऱ्यांना कमी उत्पादन झाले,त्या मुळे त्यांनी भात व मिठाचा खर्च देण्यास नकार दिला.म्हणून मोरया गोसावी यांनी सिंहगड चे किल्लेदारास त्या शेतकऱ्यांना अटक करण्यास सांगितले.छत्रपतींच्या जवळचे व्याही शिर्के,आणि युवराज संभाजी महाराज यांच्या सनद ने अधिकार प्राप्त झालेल्या मोरया गोसावी यांचा आदेश प्रमाण मानून किल्लेदार याने त्या शेतकऱ्यांना अटक करून कोठडीत टाकले.शेतकऱ्यांचे नातेवाईक छत्रपती शिवराय यांच्या कडे कैफियत घेऊन गेले.तेंव्हा छत्रपती नी तीन आज्ञा पत्रे लिहिली. किल्लेदार यास त्यांनी आज्ञा केली की, तुम्हास किल्लेदार आम्ही केले आहे,आमच्या आज्ञे शिवाय इतरांच्या आज्ञेचे पालन कराल तर त्याच अंधार कोठडीत तुम्हाला टाकू,त्या शेतकऱ्यांना तत्काळ मुक्त करून त्यांना सन्मानाने त्यांच्या घरी पोहोच करा.

दुसरे पत्र सचिवाला लिहिले.चिंचवड चे मोरया गोसावी यांच्या देवाचा उत्सव मोठा झाला पाहिजे,तो करण्याची जबाबदारी राजा म्हणून माझी आहे.त्याचा खर्च माझ्या खाजगितून करावा.त्याची तोशीस रयतेला लागता कामा नये.

तिसरे पत्र त्यांनी मोरया गोसावी यांना लिहिले तुम्ही तर गोसावी,राज्य कारभाराची इतकी हाव कशासाठी? तशी हाव असेल तर तुमची वस्त्रे आम्हाला द्या व आमची वस्त्रे तुम्ही घ्या या उपर् राज्य कारभारात हस्तक्षेप कराल तर ब्राम्हण म्हणून मुलाहिजा ठेवणार नाही हे ध्यानी धरा.

बोगस जात दाखले घेऊन राजकारण करणाऱ्याची इतकीच गरज राष्ट्रवादी काँग्रेस ला असेल तर त्यांनी त्यांना राष्ट्रवादी चे कोट्यातून विधान परिषद आमदार बनवून त्यांना थेट मंत्री किंवा पक्ष प्रमुख ही बनवावे.पण त्याची तोशीस खऱ्या मागास वर्गीय समाजाला लावू देऊ नये.अश्या बनावट जात दाखला घेऊन राजकारणातील सत्ता भोगण्याची हाव इतकी असेल तर त्यांनी स्वतः ला महार मांग म्हणून घोषित करावे आणि खुशाल या आरक्षित जागेवर आमदार व्हावे,आणि शेवटी एवढेच सांगतो की आत्ता तुमचे पुरोगामी पणाचे ढोंग बंद करा,आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पुरोगामी म्हणून खूप प्रेम या पक्षावर केले,आयुष्याची अनेक वर्ष या पक्षासाठी घालवली,आत्ता तुमचा मुलाहिजा राखला जाणार नाही.मी मागासवर्गीय समाजाला आवाहन करतो की सापाला मत द्या पण राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाला मत देऊ नका...

जय जिजाऊ,जय शिवराय,जय अहिल्या
जय भीम,जय अण्णा भाऊ!

**ॲड अविनाश टी काले,९९६०१७८२१३,**
**अकलूज,जिल्हा सोलापूर.**

# सर्व सामान्यांना न्याय देणारा लोकप्रतिनिधी सतेत पाठवा-राम चौधरी

**बहुजन नेते नागनाथ घिसेवाड यांचा वाढदिवस विविध उपक्रमाणे साजरा**

भोकर / सिद्धार्थ जाधव / महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वंचित घटकासह महिला, पुरुषांना समान हक्क दिले. मतदानाच्या माध्यमातून सत्तेत कुणाला पाठवायचे याचा अधिकार दिला सत्तेचा माज आल्यावर त्यांना खाली खेचण्याचाही अधिकार संविधानाने दिला तो अधिकार मतदारांनी योग्य पद्धतीने वापरून सर्वसामान्यांचा लोकप्रतिनिधी बहुजन नेते नागनाथ घिसेवाड यांना सत्तेत पाठवले पाहिजे असे प्रतिपादन मुदखेडचे माजी नगराध्यक्ष राम चौधरी यांनी केले.

कै. लक्ष्मणराव घिसेवाड विद्यालयाच्या प्रांगणात गुरुवार दिनांक १५ ऑगस्ट २०२४ रोजी बहुजन नेते नागनाथ घिसेवाड यांचा वाढदिवस विविध उपक्रमाणे थाटामाटात साजरा करण्यात आला यावेळी राम चौधरी हे अध्यक्षपदावरून बोलत होते.घिसेवाड यांच्या वाढदिवसानिमित्त भोकर मतदारसंघातील आणि जिल्ह्यातील सर्व थरातील अनेक मान्यवर लोकांनी दिवसभर हार तुरे घालून घिसेवाड यांना शुभेच्छा दिल्या यावेळी बोलतांना राम चौधरी म्हणाले सत्तेत गेलेले प्रस्थापित हे सर्वच चोर आणि दरोडेखोर आहेत मुंबईला सर्वजण बसून वाटून खातात सत्ताही कुण्या बाप जाणद्याची



मक्तेदारी नाही मी स्वतः आमदारकीसाठी अनेक वेळा निवडणूक लढविली पराभव पचवला मी आता कोण्या पक्षात नाही पण सत्तेत गेल्यावर ज्यांना माज चढतो त्यांची त्यांची मस्ती उतरण्याची धमक माझ्यात आहे. माजी मुख्यमंत्री खा. अशोक चव्हाण यांच नाव न घेता चौधरी म्हणाले सत्ता उपभोगलेल्यांना चटक लागलेली असते एका रात्रीतून काय चमत्कार झाला काँग्रेसचे अशोकराव चव्हाण एका रात्रीतून पक्ष बदलून जय श्रीराम म्हणू लागले आता घराणेशहीचा वारसा जपत आपल्या पोरीला आमदार करण्यासाठी दारोदार फिरू लागले.लायकी नसलेली लोक सत्तेत जातात त्यांना इतर लोक चालत नाहीत नागनाथ घिसेवाड हा बहुजनासाठी संघर्ष योद्धा आहे महात्मा फुले,डॉ.आंबेडकर हे दिन दुबळ्या वंचित घटकांच्या न्याय हक्कासाठी जीवनभर झिजले त्यांनी कधी आमदार, खासदारकीचे स्वप्न पाहिले नाही घिसेवाड तुम्ही बहुजनांच्या हितासाठी संघर्ष करा एक ना एक दिवस आमदार व्हाल अशा शुभेच्छा चौधरी यांनी दिल्या यावेळी डॉ. उत्तम जाधव, ओबीसी नेते नामदेव आयलवाड,प्रविण गायकवाड मुदखेड, एमआयएमचे जुनेद पटेल,ओबीसी नेते रामेश्र्वर गौड यांची भाषणे झाली व्यासपीठावर उत्तम पाटील हसापूरकर ज्येष्ठ कार्यकर्ते एल.ए.हिरे,उज्वल केसराळे,अँड. परमेश्र्वर पांचाळ,सतीश देशमुख,चंपत मेंडके, खालेद मौलाना,मनोज गिमेकर,सुभाष नाईक,ओबीसी नेते,बालाजी खरडे आदिची उपस्थिती होती.

सत्काराला उत्तर देताना घिसेवाड म्हणाले सर्व संत थोर पुरुषांचा वारसा घेऊन बहुजनांच्या न्याय हक्कासाठी मी लढत राहीन वाढदिवसानिमित्त माझ्यावर अनेक तळागाळातील लोक बहुजन बांधवांनी शुभेच्छाचा वर्षाव केला त्याबद्दल मी सर्वांचा ऋण व्यक्त करतो ! कार्यक्रमाचे प्रस्ताविक नागोराव शेंडगे यांनी केले.सूत्रसंचालन पत्रकार बि.आर.पांचाळ यांनी केले तर आभार प्रा.गणेश जाधव यांनी मानले कार्यक्रमास मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

## विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेत. सह.सा. कारखान्यात ७८ व्या स्वातंत्र्य दिना निमित्त ध्वजारोहण संपन्न

विलासनगर : विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. विलासनगर ता.जि. लातूर येथे ७८ व्या स्वातंत्र्य दिना निमित्त कारखान्याचे चेअरमन सहकार महर्षी मा.श्री.दिलीपरावजी देशमुख साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत कारखान्याचे व्हा. चेअरमन श्री. श्रीशैल उटगे यांच्या हस्ते कारखाना साईटवरील प्रशासकिय इमारतीसमोर सकाळी ठीक १०.०१ वाजता ध्वजारोहण करण्यांत आले. सदर प्रसंगी माजी मंत्री सहकार महर्षी मा.श्री दिलीपरावजी देशमुख यांनी सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच सर्वांना समता व बंधुत्वाचा संदेश दिला.



यावेळी जागृतीचे व्हा चेअरमन, श्री लक्ष्मणराव मोरे, जिल्हा बँकेचे व्हा. चेअरमन, श्री. प्रमोद जाधव, विलास कारखान्याचे व्हा. चेअरमन, रवी काळे, संचालक गुरुनाथ गवळी, गोविंद डुरे, संजय पाटील, बिडवे, रेणा कारखान्याचे व्हा. चेअरमन अनंतराव देशमुख, संचालक संभाजी रेड्डी, लातूर कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती, जगदीश बावणे, मारुती महाराज कारखान्याचे चेअरमन शाम भोसले, व्हा. चेअरमन सचिन पाटील, इंदिरा सुत गिरणीचे चेअरमन बाळासाहेब कदम, लातूर जिल्हा बँकेचे माजी चेअरमन श्रीपतराव काकडे. माजी व्हा. चेअरमन, पृथ्वीराज शिरसाट, माजी अध्यक्ष कॉग्रेस सेवादल श्री रमेश सुर्यवंशी, सचिन दाताळ, संभाजी सुळ व विविध संस्थाचे पदाधिकारी तसेच कारखान्यांचे सर्व सन्माननीय संचालक मंडळ, कार्यकारी संचालक श्री. पंडित देसाई, खाते प्रमुख, अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मुख्यमंत्री 'भावा'शी राज्यातील लाडक्या बहिणींचा संवाद; लातूर जिल्ह्यातील महिलांचीही कार्यक्रमाला उपस्थिती**

लातूर, : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या दोन हप्त्यांची तीन हजार रुपये इतकी एकत्रित रक्कम लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा होण्यास सुरूवात झाली आहे. आजपर्यंत राज्यातील सुमारे ८० लाख भगिनींच्या खात्यात प्रत्येकी तीन हजार रुपये जमा झाले असून या लाभार्थ्यांशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रातिनिधीक स्वरूपात दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधला. त्यावेळी लाभार्थी भगिनींनी आपल्या भावना व्यक्त करताना, मी आता मुख्यमंत्र्यांची बहीण आहे... अशी नवीन ओळख निर्माण झाल्याचे सांगत मनमोकळेपणाने आपल्या मुख्यमंत्री भावाशी संवाद साधला. लातूर जिल्हाधिकारी कार्यालय येथूनही काही लाभार्थी महिला या कार्यक्रमाला उपस्थित होत्या.

जिल्ह्यातील अनेक महिलांच्या खात्यावर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे तीन हजार रुपये जमा झाले आहेत. यापैकी काही महिला आज जिल्हाधिकारी कार्यालयात उपस्थित होत्या. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी जावेद शेख, नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे यांचीही यावेळी उपस्थिती होती.

यावेळी मनोगत व्यक्त करताना चिंचोली राववाडी येथील शेतमजुरी करणाऱ्या उषा सगर म्हणाल्या की, आमच्या सारख्या शेतमजुरी करणाऱ्या महिलांना अनेकदा इतरांकडे पैशासाठी हात पसरावा लागत होता. मात्र, आता प्रत्येक महिन्याला मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून दीड हजार मिळणार असल्याने फार मोठी मदत होणार आहे. ही योजना सुरु केल्याबद्दल आम्ही शासनाचे आभारी आहोत. याच गावातील शेतमजुरी करणाऱ्या हलीमा अजीज सय्यद यांनीही मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे तीन हजार बँक खात्यात जमा झाल्याबद्दल शासनाचे आणि मुख्यमंत्र्यांचे आभार मानले. या पैशामुळे मुलांच्या शिक्षणासाठी आणि कुटुंबाच्या खर्चासाठी मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

उदगीर तालुक्यातील लोहारा येथील रहिवासी आणि सध्या लातूर येथे राहत असलेल्या स्वाती सुडे यांनी सांगितले की, शिवणकाम करून कुटुंबाला हातभार लावण्यासाठी मी शिवण क्लास पूर्ण केला आहे.

# आ अभिमन्यू पवार यांच्या हस्ते विविध विकासकामांचा शुभारंभ...

औसा – आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रयत्नाने मंजूर झालेल्या औसा मतदारसंघातील २३ कोटींच्या ४ रस्ते सुधारणा कामाचे तसेच औसा तालुक्यातील ८ मंडळधिकारी व ४७ तलाठी कार्यालय व शासकीय अधिकारी / कर्मचारी निवासस्थान बांधकामाचा शुभारंभ (दि.१५) ऑगस्ट रोजी आ अभिमन्यू पवार यांच्या हस्ते संपन्न झाला.



आ अभिमन्यू पवार यांच्या प्रयत्नातून औसा विधानसभा मतदारसंघात विविध विकासकामांचा सपाटा सुरू असून गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या कामांना कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर करून हि कामे पूर्ण करण्यात येत आहेत. दरम्यान स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून मतदारसंघातील औसा ते औसा तांडा ६ कोटी ५० लक्ष श्रीक्षेत्र गोपाळपूर, औसा ते खानापूर तांडा २ कोटी औसा ते आलमला १० कोटी ५० लक्ष व आलमला रस्त्यावरील सुटलेल्या रस्त्याची पुलासह सुधारणा करणे ४ कोटी या २३ कोटींच्या ४ विकासकामांचे भूमिपूजन आ अभिमन्यू पवार यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच यावेळी औसा तालुक्यातील ८ मंडळ अधिकारी व ४७ तलाठी कार्यालय बांधकामासाठी ८ कोटी २५ लक्ष रुपये तर औसा येथील शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचे करिता निवासस्थान बांधकाम करण्यासाठी १५ कोटी रुपये निधी आ अभिमन्यू पवार यांनी मागे मंजूर करुन आणला होता, सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करुन स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून मंडळ अधिकारी कार्यालय, तलाठी कार्यालय व शासकीय निवासस्थान बांधकामाचा यावेळी प्रत्यक्षात शुभारंभ करण्यात आला.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती चंद्रशेखर सोनवणे, जिल्हा प्रभारी संतोषअप्पा मुक्ता, सुनील उटगे, माजी नगरसेवक बंडू कोद्रे, अँड परिक्षीत अभिमन्यू पवार, बाजार समितीचे संचालक विकास नरहरे, बांधकाम विभागाचे अभियंता रोहन जाधव, गोपाळ धानुरे, लहू कांबळे, इम्रान पटेल, इम्रान सय्यद, अक्रम खान, बांधकाम उपअभियंता श्री साठे, आदी उपस्थित होते.सदरील चारही रस्ते ग्रामीण भागातील अनेक गावांना औसा शहराशी जोडतात, त्यामुळे ही कामे पूर्ण झाल्यानंतर औसा शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांनाही याचा फायदा होणार आहे. तसेच मंडळ अधिकारी कार्यालय, तलाठी कार्यालय व शासकीय अधिकारी निवासस्थान बांधकाम पूर्ण झाल्यानंतर औसा तालुक्यातील नागरिकांना अधिक सुलभपणे शासकीय सेवा प्रदान करता येणार आहेत.

## मनपा शाळांतील ११०० विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी आरोग्य-शिक्षण विभागाचा महत्त्वपूर्ण उपक्रम दरमहा होणार नियमित आरोग्य तपासणी

लातूर/प्रतिनिधी:लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने



चालविल्या जाणाऱ्या शाळांमधील ११०० हून अधिक विद्यार्थ्यांची पालिकेच्या वतीने आरोग्य तपासणी करण्यात आली.यात ९७ विद्यार्थ्यांना काही समस्या असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांच्यावर उपचार करण्यात आले. मनपाच्या वतीने लातूर शहरात एकूण १६ शाळा चालवल्या जातात.या शाळांमध्ये शेकडो विद्यार्थी शिक्षण घेतात.या विद्यार्थ्यांचे आरोग्य निरोगी रहावे या हेतूने मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे आणि उपायुक्त(आरोग्य) डॉ.पंजाब खानसोळे यांच्या निर्देशानुसार वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ शंकर भारती यांच्या नियंत्रणाखाली आरोग्य विभागात कार्यरत असणारे वैद्यकीय अधिकारी डॉ. सुनीता कदम,डॉ. प्रकाश मुडपे,डॉ. श्यामा जाधव,डॉ. स्वाती मजगे,डॉ. शर्वरी महाजन,डॉ. आकांक्षा वाडेकर,डॉ. सारा सय्यद,डॉ. कविता काबरा आणि विशेष वैद्यकीय तज्ञामार्फत ही आरोग्य तपासणी करण्यात आली. या तपासणी अंतर्गत विद्यार्थ्यांचे उंची, वजन सोबतच रक्त (हिमोग्लोबिन, अनेमिया), कान, नाक, घसा, डोळे, दात यांच्या विविध वैधकीय तपासणी करण्यात आले. यातील कांही विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक समस्या असल्याचे लक्षात आले. काही विद्यार्थ्यांना कान,नाक व घसा या संदर्भातील आरोग्य समस्या निष्पन्न झाल्या. तर ४६ विद्यार्थ्यांना दंतचिकित्सा गरजेची असल्याचे निदर्शनास आले. तर १६ विद्यार्थ्यांना डोळ्यांचे समस्या असल्याचे स्पष्ट झाले.या सर्व विद्यार्थ्यांना संदर्भिय आरोग्यसेवा देण्यात आली. शालेय विद्यार्थ्यांमध्ये असणाऱ्या आरोग्य समस्यावर याच वयात उपचार झाले तर भविष्यात व्याधी वाढणार नाहीत व नियमित आरोग्य तपासणी मुळे विद्यार्थी तंदुरुस्त राहतील यासाठी पालिकेने ही तपासणी मोहीम हाती घेतली होती.

# संशोधनाचा विकास होणे ही काळाची गरज - प्रा.ज्योती कावळे

लातूर : आजच्या काळात संशोधनाचा विकास होणे आणि त्यामध्ये पारदर्शीपणा असणे ही काळाची गरज आहे. संशोधन हे विद्यार्थ्यांच्या तसेच समाजाच्या आणि देशाच्या विकासाची अत्यंत महत्त्वाची पायरी आहे. संशोधनामुळे असलेल्या नवनवीन समस्यांचे निराकरण करण्यास मदत होते. त्यासाठी विद्यार्थ्यांनी सहकार्य करणे आणि संशोधन कार्यात भाग घेणे आवश्यक आहे. त्यामुळे, विद्यार्थ्यांनी त्यांच्या ज्ञान आणि कौशल्ये वाढवण्यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे,असे प्रतिपादन प्रा.ज्योती कावळे यांनी केले.



दि.१६ ऑगस्ट २०२४ रोजी वेंडेल स्टॅनली यांची १२० वी जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील प्रा.ज्योती कावळे, प्रा. माहेश्र्वरी पटने आणि डॉ. कोमल गोमारे यांनी वैज्ञानिकाच्या प्रतीमेस वंदन करून केली. प्रा. श्र्वेता मदने यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली.यावेळी जैवतंत्रज्ञान विभागातील बी. एस्सी. प्रथम वर्षातील कांबळे स्नेहा या विद्यार्थिनीने वैज्ञानिकाबद्दल माहिती सांगितली. वेंडेल स्टॅनलीचा यांचा जन्म १६ ऑगस्ट १९०४ रोजी रिजविले, इंडियाना येथे झाला आणि त्याने रिचमंड, इंडियाना येथील अर्लहॅम कॉलेजमध्ये रसायनशास्त्रात बीएससी मिळवले. त्यानंतर त्यांनी इलिनॉय विद्यापीठात शिक्षण घेतले, १९२७ मध्ये विज्ञानात एमएस मिळवले आणि त्यानंतर दोन वर्षांनी रसायनशास्त्रात पीएचडी केली. त्याच्या नंतरच्या कर्तृत्वांमध्ये केमिस्ट्रीः अ ब्युटीफुल थिंग हे पुस्तक लिहिणे आणि पुलित्झर पारितोषिकाचे नामांकित होणे समाविष्ट आहे. ते अमेरिकन बायोकेमिस्ट, विषाणूशास्त्रज्ञ आणि नोबेल पारितोषिक विजेते होते. १५ जून १९७१ रोजी या महान शास्त्रज्ञाची प्राणज्योत मावळली.याप्रसंगी जैवतंत्रज्ञान विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच पदवी आणि पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस १८ ऑगस्ट रोजी साधणार लाडक्या बहिणींशी संवाद भाजपा महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांची माहिती

मुंबई : महिला सक्षमीकरणासाठी महायुती सरकारने घोषित केलेल्या 'लाडकी बहीण' योजनेचा ३ हजार रुपयांचा पहिला हप्ता लाडक्या बहिणींच्या खात्यात जमा झाला आहे. या योजनेबद्दल माताभगीनींच्या मनातील भावना जाणून घेण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस येत्या रविवारी १८ ऑगस्ट रोजी राज्यातील लाडक्या बहिणींशी संवाद साधणार आहेत. भारतीय जनता पार्टीच्या महिला मोर्चाने या उपक्रमाला व्यापक स्वरूप देण्यासाठी पुढाकार घेत हा 'लाडक्या बहिणींचे लाडके देवाभाऊ' कार्यक्रम आयोजित केल्याची माहिती महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांनी शुक्रवारी दिली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या.

# आदर्श मैत्री फाऊंडेशनच्या सायकल बँक उपक्रमांतर्गत गरजू विद्यार्थ्यांना १०० सायकलींचे वितरण सायकल बँक उपक्रम समाजासाठी दिशादर्शक - मंत्री संजय बनसोडे

लातूर (प्रतिनिधी) : लातूरच्या आदर्श मैत्री फाउंडेशनच्या सायकल बँक उपक्रमाच्या माध्यमातून घरापासून दूर अंतरावरील शाळा असलेल्या गरीब होतकरू विद्यार्थ्यांसाठी सायकल उपलब्ध करून देत आहे. हा उपक्रम समाजासाठी दिशादर्शक असल्याचे मत राज्याचे क्रीडा व युवक कल्याणमंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केलं. ते आदर्श मैत्री फाउंडेशनच्या सायकल बँक उपक्रमाच्या उदघाटनाप्रसंगी बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठवाडा शिक्षक आमदार विक्रम काळे हे होते. तर अहमदपूरचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आ. बाबासाहेब पाटील यांनी प्रमुख उपस्थिती होती. मंचावर राष्ट्रवादी काँग्रेसचे व्यंकट बेद्रे, आदर्श मैत्रीचे अध्यक्ष संतोष बिराजदार, प्रा. शिवराज मोटेगावकर, सोनू डगवाले, तुकाराम पाटील, सहायक पोलिस निरीक्षक दयानंद पाटील, ओमप्रकाश झुरुळे, निलेश राजेमाने, विवेक सौताडेकर, श्रीकांत हिरेमठ, शशिकांत पाटील, प्रमोद भोयरेकर,यांची प्रमुख उपस्थिती होती. लातूर जिल्ह्यातील गरीब–होतकरू विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी आदर्श मैत्री फाउंडेशनच्या वतीने गेल्या ०३ वर्षांपासून सायकल दान महाअभियानाच्या माध्यमातून सायकल बँक हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून आज स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून तब्बल १०० सायकलींचे मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले. अनेक गरीब होतकरू विद्यार्थ्यांना आजही शाळेत जाण्यासाठी पायपीट करावी लागते. अशा विद्यार्थ्यांचा शोध घेऊन फाउंडेशनच्या सायकल बँक उपक्रमात सायकल दान देण्याचे आवाहन आदर्श मैत्री फाउंडेशनतर्फे करण्यात आले. ज्यात अनेक दानशूर व्यक्तींनी सायकल दान केल्या. ज्यात क्रीडा मंत्री संजय बनसोडे, अहमदपूरचे आ. बाबासाहेब पाटील, शिक्षक आमदार विक्रम काळे



यांच्यासह अनेक दानशूर व्यक्तींनी या सायकल दान महाअभियानात सहभाग नोंदविला. याप्रसंगी पुढे बोलताना क्रीडा मंत्री बनसोडे म्हणाले की, आदर्श मैत्री फाउंडेशनने विविध क्षेत्रातील सामाजिक कार्य करीत आपलं वेगळंपण कायम सिद्ध केलंय. मात्र गरीब होतकरू विद्यार्थ्यांच्या शाळेला जाण्यासाठी येणाऱ्या शैक्षणिक अडचणी दूर केल्या आहेत. त्यामुळे सायकल बँक उपक्रम हा समाजासाठी दिशादर्शक असल्याचे ना. बनसोडे म्हणाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात बोलताना शिक्षक आ. विक्रम काळे म्हणाले की, सायकल बँक उपक्रमात दरवर्षी सायकल देणाऱ्या दात्यांची तसेच गरजू विद्यार्थ्यांची संख्या ही १०० वर गेली आहे. त्यामुळे फाउंडेशनचे कौतुक करीत पुढच्या वर्षी हा आकडा २०० पार जाईल असा विश्र्वास व्यक्त केला. तर अहमदपूरचे आ.बाबासाहेब पाटील आपल्या मनोगतात बोलताना म्हणाले की, सायकल बँक उपक्रमामुळे गरजू विद्यार्थ्यांच्या जीवनात निश्र्चितच शैक्षणिक क्रांती येऊ शकेल. ज्यावेळेस हे विद्यार्थी यशस्वी होऊन स्वतःच्या पायावर उभे राहतील, त्यावेळेस या विद्यार्थ्यांनी आदर्श मैत्री फाउंडेशनच्या या उपक्रमात आपला सहभाग नोंदवावा अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी प्राचार्य निलेश राजेमाने, ओमप्रकाश झुरुळे यांचीही भाषणं झाली. तत्पूर्वी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आदर्श मैत्री फाउंडेशनचे अध्यक्ष संतोष बिराजदार यांनी केले व त्यात सायकल बँक उपक्रमाची माहिती सांगत फौंडेशन च्या सर्व उपक्रमाची माहिती सांगितली. यावेळी सायकल बँक उपक्रमात सहभाग नोंदविणाऱ्या दानशूर व्यक्तींचा मान्यवरांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संभाजी नवघरे यांनी केले. तर आभार प्रा.शिवराज मोटेगावकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सायकल बँकचे समन्वयक राजेश मित्तल, संतोष बालगीर, प्रवीण सूर्यवंशी,संपत जगदाळे,महेश शिंदे,प्रमोद टेकले यांनी परिश्रम घेतले. यावेळी, पप्पू बाहेती,स्वप्नील गौरशेटे, अरविंद औरादे, चंद्रशेखर गिरी,अनंत सूर्यवंशी,असिफ शेख, पत्रकार इस्माईल शेख आदींसह अनेकांची उपस्थिती होती.

